**शैक्षणिक वर्ष २०२४-२५ पासून अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषद,नवी दिल्ली यांच्या अखत्यारीतील बी.बी.ए., बी.बी.एम., बी.एम.एस., बी.सी.ए, एमबीए इंटिग्रेटेड आणि एमसीए इंटिग्रेटेड या अभ्यासक्रमाच्या संस्थांना तसेच, सदर संस्थांतील अभ्यासक्रमांना शासन मान्यता देणेबाबत...**

**महाराष्ट्र शासन**
**उच्च व तंत्रशिक्षण विभाग**
**शासन निर्णय क्र.मान्यता-२०२४/प्र.क्र.२४५/तांशि-४**
मादाम कामा रोड, हुतात्मा चौक राजगुरु चौक,
मंत्रालय विस्तार भवन, मुंबई-४०० ०३२.
**दिनांक: ०७ ऑगस्ट, २०२४.**

**वाचा** : संचालक, तंत्र शिक्षण यांचे पत्र क्र.२/एनजीसी/ BBA BCA Approval/२०२४/ ५५१, दि.०२.०८.२०२४.

**प्रस्तावना :** अखिल भारतीय तंत्र शिक्षण परिषद, नवी दिल्ली यांनी दिलेल्या मान्यतेस अनुसरुन, संचालक, तंत्रशिक्षण यांनी उपरोक्त वाचा येथील पत्रान्वये, बी.बी.ए., बी.बी.एम., बी.एम.एस., बी.सी.ए., एमबीए इंटिग्रेटेड आणि एमसीए इंटिग्रेटेड या अभ्यासक्रमाच्या संस्थांना तसेच, या संस्थांमधील अभ्यासक्रमांना, शासन मान्यता देण्याबाबतचा प्रस्ताव सादर केला आहे. त्यानुसार मान्यता देण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**शासन निर्णय :-** अखिल भारतीय तंत्र शिक्षण परिषद, नवी दिल्ली यांनी दिलेल्या मान्यतेस अनुसरून, सोबतच्या **प्रपत्र - अ** मध्ये दर्शविलेल्या बी.बी.ए., बी.बी.एम., बी.एम.एस., बी.सी.ए., आणि **प्रपत्र - ब** मध्ये दर्शविलेल्या एमबीए इंटिग्रेटेड आणि एमसीए इंटिग्रेटेड या अभ्यासक्रमाच्या संस्थांना तसेच, या संस्थांमधील अभ्यासक्रमांना शैक्षणिक वर्ष २०२४-२५ पासून खालील अटी व शर्तीच्या अधीन राहून शासन मान्यता देण्यात येत आहे.

**अटी व शर्ती:-**

१) सदर मान्यता ही कायम विनाअनुदानित / स्वयं अर्थसहाय्यित तत्वावर राहील.

२) सदर मान्यता दिलेले अभ्यासक्रम चालविणाऱ्या उच्च शिक्षण संचालनालयाच्या अखत्यारीतील संस्था ह्या उच्च शिक्षण संचालनालयाच्या अधिपत्याखाली राहतील. परंतु, सदर अभ्यासक्रमाचे परिचालन व सदरील अभ्यासक्रमांची मान्यता प्रक्रिया, प्रवेश, शुल्क इ. बाबी ह्या तंत्रशिक्षण संचालनालयाच्या अधिपत्याखाली राहतील.

३) सदर मान्यता दिलेले अभ्यासक्रम चालविणारी तंत्रशिक्षण संचालनालयाच्या अधिपत्याखालील संस्था तसेच, सदर मान्यता दिलेले अभ्यासक्रम चालविणारी पुर्णतः नवीन संस्था ह्या तंत्रशिक्षण संचालनालयाच्या अधिपत्याखाली कायम विनाअनुदानित तत्वावर / स्वयं अर्थसाहाय्यित तत्वावर सुरु राहतील.

४) अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषदेने विहित केलेल्या तसेच, दि.२१ मे, १९८३ च्या शासन निर्णयातील अटींची पूर्तता करणे, संस्थांवर बंधनकारक राहील.

५) सदरील मान्यता दिलेल्या अभ्यासक्रमाच्या संबधित संस्थेने अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषद व संबधित विद्यापीठ यांच्या मानकांनुसार मुलभुत भौतिक सोयीसुविधांची पुर्तता करणे अनिवार्य राहील.

६) सदरील मान्यता दिलेल्या अभ्यासक्रमाच्या उच्च शिक्षण व तंत्रशिक्षण संचालनालयाच्या अखत्यारीतील संबधित संस्थेत सुरु केलेल्या अभ्यासक्रमांस लागणा-या भौतिक सोयीसुविधा, शिक्षकवृंद व इतर तांत्रिक कर्मचारी, ग्रंथालयाकरिता आवश्यक ती पुस्तके, नियतकालिके, प्रयोगशाळा, वाचनालय, वर्गखोल्या इ. स्वतंत्रपणे उभारणे आवश्यक राहील.

७) शासनाने विहित केलेल्या, तसेच, अखिल भारतीय तंत्र शिक्षण परिषद, नवी दिल्ली यांनी विहित केलेल्या सर्व अटी व शर्ती मान्य असल्याबाबत महाविद्यालय / संस्थेने संचालक, तंत्र शिक्षण संचालनालय, मुंबई यांच्याशी करारनामा करावा लागेल. तसेच, महाविद्यालयांनी / संस्थांनी आवश्यक कागदपत्रांची आणि औपचारिक बाबींची पूर्तता संचालक, तंत्र शिक्षण यांच्या संमतीने समाधानकारकरित्या पूर्ण करावी.

८) संबंधित महाविद्यालय / संस्थेने, संचालक, तंत्र शिक्षण यांचेकडे आवश्यक ती संचित ठेव संयुक्त खात्यात भरुन इतर कायदेशीर बाबींची पूर्तता करावी.

९) संस्थेतील अभ्यासक्रमांचे प्रवेश शासनाने मान्य केलेल्या संबंधित अभ्यासक्रमाच्या प्रवेश नियमानुसार/ पद्धतीनुसार तंत्रशिक्षण संचालनालया अंतर्गत करण्यात येतील.

१०) शुल्क नियामक प्राधिकरणाने / शासनाने विहित केलेल्या शिक्षण शुल्कापेक्षा जास्त शुल्क संस्थेने आकारल्यास, संस्थेवर / महाविद्यालयावर महाराष्ट्र एज्युकेशनल इन्स्टिट्युशन (प्रोहिबिशन ऑफ कॅपिटेशन फी) ॲक्ट, १९८७ अनुसार कारवाई करण्यात येईल.

११) संबंधित संस्थेने अभ्यासक्रम चालविण्याकरिता शिक्षकवृंद व इतर तांत्रिक कर्मचारी अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषद, नवी दिल्ली व संबंधित विद्यापीठाच्या मानकानुसार नियुक्त करावेत. त्यांना नियमानुसार वेतन व भत्ते देण्यात यावेत. तसेच, शिक्षकवृंद व इतर कर्मचाऱ्यांच्या वेतन व भत्ते इ. बाबत तसेच, विद्यार्थ्यांकडून शासनाकडे तक्रारी आल्यास संस्थांवर विद्यापीठांच्या नियमाप्रमाणे व अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषदेच्या निकषाप्रमाणे / नियमानुसार कडक कारवाई करण्यात येईल.

१२) संस्थेने ग्रंथालयाकरिता आवश्यक ती पुस्तके, नियतकालिके अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषदेच्या मानकानुसार खरेदी करणे आवश्यक राहील. तसेच, विद्यार्थ्यांना वाचनालयाचा पुरेपूर उपयोग होण्याच्या दृष्टीने ग्रंथालयात विद्यार्थ्यांना अभ्यासिकेची सोय करणे आवश्यक आहे. तसेच, विद्यार्थ्यांना अखिल भारतीय तंत्र शिक्षण परिषदेच्या मानकाप्रमाणे सर्व शैक्षणिक सोयीसुविधा (उदा. प्रयोगशाळा, वाचनालय, वर्गखोल्या इ.) स्वतंत्रपणे करणे आवश्यक आहे.

१३) रॅगिंगसंदर्भात मा. सर्वोच्च न्यायालयाचे निर्देश व महाराष्ट्र प्रोहिबिशन ऑफ रॅगिंग ॲक्ट, १९९९ यांची कठोरपणे अंमलबजावणी करणे महाविद्यालय / संस्थेवर बंधनकारक राहील.

१४) संबंधित महाविद्यालय / संस्थेने सदर अभ्यासक्रम चालविण्यासाठी आवश्यक स्थावर जंगम मालमत्तेकरिता शासनाकडून किंवा कोणत्याही वित्तीय संस्थेकडून कर्ज घेतले असल्यास, त्याची परतफेड करण्याची सर्वस्वी जबाबदारी संस्थेची / महाविद्यालयाची राहील.

१५) जर संबंधित महाविद्यालय / संस्थेने संचालक, तंत्र शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई तसेच, संचालक, उच्च शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, पुणे यांच्याकडे नोंदणी शुल्काचा भरणा केलेला नसेल तर, ती अंतीम मान्यता देण्यापूर्वी संचालक, तंत्र शिक्षण यांनी महाविद्यालयाकडून दि.२२.०२.२०१८ च्या शासन निर्णयाप्रमाणे नोंदणी शुल्क वसूल करावे.

१६) ज्या संस्थांनी उच्च शिक्षण संचालनालयाकडे नोंदणी करण्यासाठी दि.१५.०७.२०२४ रोजीच्या शासन निर्णयान्वये शुल्क भरणा केले असेल, त्या संस्थांनी उच्च शिक्षण संचालनालयाकडे शुल्क भरल्याची पावती दाखवून दि.२२.०२.२०१८ च्या शासन निर्णयात दर्शविल्याप्रमाणे फरकाची रक्कम तंत्र शिक्षण संचालनालयाकडे जमा करावी.

१७) संबंधित महाविद्यालय / संस्थेने, संबंधित विद्यापीठाचे वेळोवेळी संलग्निकरण प्राप्त करुन घेणे आवश्यक राहील.

१८) याशिवाय, संचालक, तंत्र शिक्षण, महाराष्ट्र राज्य, मुंबई व संबंधित विद्यापीठ यांनी घालून दिलेल्या अन्य अटी व शर्ती महाविद्यालयावर / संस्थेवर बंधनकारक राहतील.

२. सदर शासन मान्यतेनुसार, उक्त महाविद्यालयातील अभ्यासक्रमांचा केंद्रीभूत प्रवेश प्रक्रियेमध्ये समावेश होण्याकरिता संचालक, तंत्र शिक्षण यांनी आवश्यक ते आदेश निर्गमित करावेत. तसेच, या शासन निर्णयात नमूद अभ्यासक्रम राबविणाऱ्या संस्थांची, उच्च शिक्षण संचालनालयाच्या अधिपत्याखालील विद्यमान संस्था, तंत्रशिक्षण संचालनालयाच्या अधिपत्याखालील विद्यमान संस्था व तंत्रशिक्षण संचालनालयाच्या अधिपत्याखालील नवीन संस्था यांची वर्गवारी संचालक, तंत्र शिक्षण यांनी करावी.

३. हा शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करुन देण्यात आला असून त्याचा संकेतांक २०२४०८०७१११५५०७७०८ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकीत करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

SHAHAJAHAN SHAKUR MULANI

Digitally signed by SHAHAJAHAN SHAKUR MULANI
DN: CN = SHAHAJAHAN SHAKUR MULANI, C = IN, S = Maharashtra, O = GOVERNMENT OF MAHARASHTRA, OU = HIGHER AND TECHNICAL EDUCATION DEPARTMENT
Date: 2024.08.07 11:31:39 +05'30'

**(शहाजहान मुलाणी)**
**अवर सचिव, महाराष्ट्र शासन.**

**प्रति,**

१) मा.मंत्री, उच्च व तंत्र शिक्षण यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई

२) संचालक, तंत्र शिक्षण, महाराष्ट्र राज्य, मुंबई

३) संबंधित सहसंचालक, तंत्र शिक्षण विभागीय कार्यालय (संचालक, तंत्र शिक्षण यांच्यामार्फत).

४) कुलसचिव, संबंधित विद्यापीठ (संचालक, तंत्र शिक्षण यांच्यामार्फत)

५) संबंधित महाविद्यालय / संस्था (संचालक, तंत्र शिक्षण यांच्यामार्फत)

६) निवडनस्ती/तांशि-४